आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ ऑगस्ट २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- राज्यात सर्वदूर पाऊस, अनेक ठिकाणी नद्या, जलाशयांच्या पाणीपातळीत वाढ
- श्रीकृष्णजन्म आणि गोपाळकाला सर्वत्र उत्साहानं साजरा
- मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचं उद्घाटन उद्या सरन्यायाधीशांच्या हस्ते होणार

**आणि**

- ऑस्ट्रेलियाचे माजी अष्टपैलू क्रिकेटपटू बॉब सिम्पसन यांचं निधन / ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं निधन

**<><><><>**

**राज्य पाऊस पीटीसी जीवनपाऊस / विविध स्रोत / अभय+ गौरी**

राज्यात सर्वदूर पावसाचा जोर वाढला असून यामुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे.

राजधानी मुंबई आणि परिसरामध्ये कालपासून सुरू असलेल्या जोरदार पावसात २ जणांचा मृत्यू झाला तर २ जण जखमी झाले.

आज सकाळी साडे ८ वाजता संपलेल्या २४ तासात सांताक्रूझ वेधशाळेत २४४ मिलिमीटर तर कुलाब्यात ८३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सांताक्रूझमध्ये ऑगस्टमध्ये एका दिवसात झालेल्या सर्वाधिक पावसाचा हा गेल्या ५ वर्षातला विक्रम आहे. यापूर्वी ४ ऑगस्ट २०२० रोजी २६८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. विक्रोळी, सांताक्रूझ, शीव आणि जुहू या परिसरांमध्ये २०० मिलीमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. वांद्रे, भायखळा इथं दीडशे मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस झाल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. आज सकाळपासून भायखळ्यात १०० मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. या पावसामुळं मुंबईत ठिकठिकाणी पाणी साचून जनजीवन विस्कळीत झालं आहे. यासंदर्भात मुंबई हवामान विभागाच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी अधिक माहिती दिली…

**- - होल्ड… बाईट- शुभांगी भुते - -**

राज्यात इतरत्रही पावसाचा जोर असून ठिकठिकाणच्या जलाशयांमधे पाण्यात वाढ झाली आहे.

**पालघर** जिल्ह्यातल्या पालघर आणि बोईसर शहरात जोरदार पाऊस सुरू आहे.

**धुळे** शहराला पाणीपुरवठा करणारा  नकाणे तलाव शंभर टक्के भरला आहे. जिल्ह्यातील मध्यम आणि लघु प्रकल्प भरले आहेत.

**सोलापुरात** पावसामुळे हिप्परगा तलाव तसंच बार्शी-सोलापूर मार्गावर आगळगाव इथला चांदणी तलाव भरून वाहू लागले आहेत.  याचा तडाखा आसपासच्या सहा गावांना बसला असून त्यांचा संपर्क तुटला आहे.

**अमरावतीमध्ये** तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी नजीक असणाऱ्या टेकडीचा काही भाग रस्त्यावर कोसळला. तर अनेक गावांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. संपूर्ण जिल्ह्यात शेतीचं  मोठ्या प्रमाणावर  नुकसान झालं आहे.

**लातूर, धाराशिव आणि  बीड** या तीन जिल्ह्यांची जीवन वाहिनी म्हणून ओळख असलेलं  मांजरा धरण ९०% भरलं  आहे. आज दुपारनंतर या धरणाचे ४ दरवाजे काही प्रमाणात उघडले आहेत. नदीपात्रात पाणी सोडल्यामुळे, नदीकाठच्या  रहिवाशांनी सतर्क राहावं, असं प्रशासनानं सांगितलं आहे.

**गडचिरोलीमध्ये** नद्या नाल्यांना आलेल्या पुरामुळे ४ मार्गांवरील वाहतूक बंद आहे. गेल्या  चोवीस तासांत सिरोंचा तालुक्यात सर्वाधिक ११६ पूर्णांक ४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तर अहेरी तालुक्यात ९२ मिलिमीटर पाऊस पडला.

**सांगलीमध्ये** आज दुपारी आलेल्या जोरदार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं. **रत्नागिरीमध्ये** सतत पडत असलेल्या पावसामुळे जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे.

**वाशिम** जिल्ह्यात कालपासून सुरू असलेल्या पावसानं सोयाबीन, हळद या पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. रिसोड तालुक्यातल्या वाडी रायताळ इथं नाल्याच्या पुरामध्ये वाहून गेल्याचा एकाचा मृत्यू झाला. **यवतमाळ**मध्ये वीज पडून एकाचा मृत्यू झाला.

**हिंगोली** जिल्ह्यात ८ गावांचा संपर्क तुटला आहे. ईसापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळं धरणाचे २ दरवाजे नव्याने उघडण्यात आले असून ७

दरवाज्यांतून ११ हजार क्युसेकपेक्षा जास्त विसर्ग सुरू आहे. **परभणी** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून वादळी वारा आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस सुरू आहे.

**<><><><>**

राज्यात सर्वत्र कृष्णजन्म आणि गोपाळ काल्याचा सण उत्साहात साजरा झाला. याबाबत ऐकूया अधिक माहीती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- -व्हॉईस कास्ट- अंकिता - - -**

*(ठिकठिकाणच्या श्रीकृष्ण मंदिरांमधे जन्मोत्सव काल मध्यरात्री साजरा झाला. भजन कीर्तनाचे कार्यक्रम आणि आकर्षक सजावट मंदिरांमधे करण्यात आली होती.*

*आज गोपाळकाल्याचा दिवस. विशेषतः मुंबई शहर आणि उपनगरांतल्या मोठमोठ्या बक्षिसांच्या दहिहंड्या हा आजचा वैशिष्ट्यपूर्ण खेळ. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी लाखो रुपये बक्षीस असलेल्या दहीहंड्यांचं आयोजन केलं होतं. धाक्कुमाक्कुमच्या तालावर मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्याचा गोविंदांचा उत्साह भर पावसातही शिगेला पोहोचलेला पहायला मिळाला. अनेक ठिकाणी विविध गोविंदा पथकांनी आठ- नऊ थर रचले. ठाण्यात खासदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्प प्रतिष्ठानच्या दहीहंडी मधे दहा थर रचत कोकण नगरचा राजा गोविंदा पथकानं विश्वविक्रमाची नोंद केली. तर दादर मधली आयडियल दहीहंडी महिला गोविंदा पथकाने फोडली. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी दहीहंडी उत्सवाला उपस्थिती लावत जनसंपर्क वाढवण्याची संधी साधली. दहीहंडीमुळे मुंबईत - ठाण्यात २२ मार्गांवरच्या वाहतुकीत बदल करण्यात आले. सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली. या दहीहंडी उत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आणि सेलिब्रिटींची उपस्थिती ही विशेष आकर्षणं आहेत. अनेक ठिकाणच्या दहीहंड्या फोडण्यासाठी गोविंदा पथकं अजूनही प्रयत्न करत आहेत. दरम्यान गोवंडी इथं दहीहंडी खेळताना बाल गोविंदा पथकातल्या एका गोविंदाचा मृत्यू झाल्यामुळे या उत्सवाला गालबोट लागलं. तर मुंबईत ३० गोविंदा जखमी झाले. त्यांना मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत तसंच सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. जखमी गोविंदांवर मोफत उपचार करण्याच्या सूचना महपालिका आयुक्तांनी दिल्या आहेत.)*

**<><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर इथल्या सर्किट बेंचचं उद्घाटन उद्या सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या सर्किट बेंचचा लाभ कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक अराधे आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सर्किट बेंच हे तात्पुरत्या स्वरुपाचं न्यायपीठ असून गरजेनुसार त्यासमोर खटले चालवले जातात.

**<><><><>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सांगली इथं जिल्हास्तरीय बैठक घेऊन जिल्ह्यात सुरू असलेली विविध विकासकामं आणि योजनांचा आढावा घेतला. म्हैसाळ उपसा सिंचन योजना, शक्तिपीठ महामार्ग, सुकामेवा आणि एमआयडीसी संदर्भात तसंच केंद्र आणि राज्य शासन या भागात राबवत असलेल्या विविध विकास योजनांची त्यांनी माहिती घेतली.

**<><><><>**

चिमूर क्रांती दिनानिमित्त  राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी आज चिमूर इथं शहिदांना अभिवादन केलं. चिमूरचा कृती विकास आराखडा त्वरीत मंजूर करून निधी उपलब्ध करून देऊ, असं पालकमंत्री डॉ. उईके यांनी यावेळी  सांगितलं.

**<><><><>**

ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेटपटू बॉब सिम्पसन यांचं आज निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. अष्टपैलू क्रिकेटपटू असलेल्या सिम्पसन यांनी ऑस्ट्रेलियाच्या संघाचं कर्णधारपद भूषवलं होतं. ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या पुनरुज्जीवनात त्यांचं योगदान महत्त्वपूर्ण मानलं जातं. १९८० आणि १९९० च्या दशकात ऑस्ट्रेलियाच्या संघाचे ते प्रशिक्षक होते.

**<><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचं आज पुण्यात निधन झालं. त्या ६९ वर्षांच्या होत्या. 'गुरू', 'मी सिंधूताई सपकाळ', 'तिचा उंबरठा' या चित्रपटांमध्ये, तर 'मिसेस आमदार सौभाग्यवती' या आणि अनेक नाटकात त्यांनी भूमिका साकारल्या. अनेक दूरचित्रवाहिनी मालिकांमध्ये ही त्यांनी काम केलं होतं . त्यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. प्रसिद्ध अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांच्या त्या मातोश्री होत्या.

<><><><>

प्राध्यापिका, लेखिका डॉ. मोहिनी वर्दे यांचं आज पहाटे निधन झालं. त्यांनी महर्षी दयानंद महाविद्यालयात तसंच मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात त्या अध्यापन करत होत्या. त्यांनी कथा, कादंबरी, ललित गद्य, चरित्र, समीक्षा इत्यादी प्रकारांत विपुल लेखन केलं.

<><><><>

येत्या दोन दिवसात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.

//<><><><>//